




दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

**वर्ष : ०४**, अंक : २७२
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, बुधवार, दि. १४ मे २०२५


# दहावीचा निकाल ९४.१० टक्के

## उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे शालेय शिक्षण मंत्र्यांकडून अभिनंदन

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१३, ठाणे :** दहावीची परीक्षा हा विद्यार्थ्यांची शैक्षणिक दिशा ठरविणारा महत्त्वाचा टप्पा असतो. या टप्प्यावर यश मिळविलेले विद्यार्थी कौतुकास पात्र आहेत, अशा शब्दात शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी परीक्षेत यश मिळालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले असून विद्यार्थ्यांनी भविष्यातही यशाची शिखरे पादाक्रांत करावीत, अशा शुभेच्छा दिल्या आहेत.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या दहावीच्या परीक्षांचे निकाल जाहीर झाले. राज्यात एकूण ९४.१० टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून परीक्षेतील सर्व उत्तीर्ण विद्यार्थी, त्यांचे पालक व त्यांना मार्गदर्शन करणारे शिक्षक यांचे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी अभिनंदन केले आहे. तर उत्तीर्ण न होऊ शकलेल्या विद्यार्थ्यांनी नाउमेद न होता पुरवणी परीक्षेस प्रविष्ट होऊन यश संपादन करावे, असे आवाहन केले आहे.

उत्तीर्ण विद्यार्थ्यांची संख्या दहावीच्या परीक्षेत नऊ विभागीय मंडळांमधून एकूण १५ लाख ५८ हजार ०२० नियमित विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी १५ लाख ४६ हजार ५७९ विद्यार्थी प्रविष्ट झाले असून १४ लाख ५५ हजार ४३३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. निकालाची ही टक्केवारी ९४.१० अशी आहे.

**दिव्यांग विद्यार्थ्यांचे उत्तीर्णतेचे प्रमाण उल्लेखनीय**

नऊ विभागीय मंडळांमधून एकूण ९,६७३ दिव्यांग विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ९,५८५ विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ट झाले. त्यातील ८,८४४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून त्यांच्या निकालाची टक्केवारी ९२.२७ अशी उल्लेखनीय आहे. या विद्यार्थ्यांचेही भुसे यांनी अभिनंदन केले आहे.

दहावीच्या एकूण २४ विषयांचा निकाल १०० टक्के लागला आहे. तर २३ हजार ४८९ शाळांपैकी ७९२४ शाळांचा निकाल १०० टक्के लागला आहे. नियमित विद्यार्थ्यांपैकी ४ लाख ८८ हजार ७४५ विद्यार्थी प्रविण्यासह प्रथम श्रेणीत तर ४ लाख ९७ हजार २७७ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. या सर्व विद्यार्थ्यांचे शिक्षणमंत्र्यांनी कौतुक केले आहे.

### मुलींची आघाडी !

सर्व विभागीय मंडळातून नियमित उत्तीर्ण मुलींची टक्केवारी ९६.१४ इतकी असून मुलांची टक्केवारी ९२.३१ इतकी आहे. मुलींच्या निकालाची टक्केवारी मुलांपेक्षा ३.८३ टक्क्यांनी जास्त आहे.

### विभागीय मंडळनिहाय उत्तीर्ण विद्यार्थी....

राज्यातील सर्व विभागीय मंडळातून नियमित विद्यार्थ्यांचा कोकण विभागाचा निकाल सर्वाधिक म्हणजेच ९८.८२ टक्के इतका असून नागपूर विभागाचा २निकाल सर्वात कमी म्हणजे ९०.७८ टक्के इतका आहे. या व्यतिरिक्त पुणे विभागात ९४.८१, छत्रपती संभाजीनगर विभागात ९२.८२, मुंबई विभागात ९५.८४, कोल्हापूर विभागात ९६.८७, अमरावती विभागात ९२.९५, नाशिक विभागात ९३.०४ आणि लातूर विभागात ९२.७७ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले असल्याची माहिती मंडळामार्फत देण्यात आली आहे.

### ठाणे जिल्ह्यात दहावीच्या निकालात मुलींना भरघोस यश!

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या फेब्रुवारी– मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या इ.१० वी च्या परीक्षेचा निकाल आज, दि.१३ मे २०२५ रोजी जाहीर झाला आहे. जिल्ह्याचा एकूण निकाल ९५.५७% इतका लागला असून, एकूण १ लाख १३ हजार ६५८ विद्यार्थ्यांपैकी १ लाख ०८ हजार ३११ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. यात मुलींचा निकाल ९६.६९% तर मुले ९४.५०% उत्तीर्ण झाले असून, मुलींची सरासरी कामगिरी मुलांपेक्षा जास्त आहे. उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांपैकी मुलींची टक्केवारी मुलांपेक्षा अधिक असून हा एक सकारात्मक बदल आहे. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) ललिता दहितुले यांनी सांगितले करी, ‘‘यंदा ठाणे जिल्ह्यात मुलींनी यश मिळवून आपली शैक्षणिक प्रगती सिद्ध केली आहे. ही घोडदौड निश्चितच प्रेरणादायक आहे.

## शेतकऱ्यांचे डोळे आता पावसाकडे; वेळेत पाऊस सुरु होणार...
## पाऊस लवकर सुरू होणार असल्याने शेतकऱ्यांना दिलासा

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१३, अहिल्यानगर :** हवामान विभागाने २७ मे रोजी केरळमध्ये मान्सून दाखल होण्याची माहिती दिल्यानंतर शेतकऱ्यांना आता पावसाचे वेध लागले आहेत. पाऊस लवकर सुरू होणार असल्याने शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे. गेल्या चार महिन्यांपासून प्रचंड उन्हाने हैराण झालेल्या शेतकऱ्यांची उकाड्यापासून मुक्तता होणार आहे. पारनेर तालुक्यातील शेतकऱ्यांकडून रब्बी हंगामातील तयारी जवळपास पूर्ण झाली आहे. शेती मशागतीची कामे पूर्ण झाली असून, समाधानकारक



पाऊस झाल्यानंतर पेरण्या सुरू होणार आहेत. पावसाची आतुरतेने वाट पाहणाऱ्या बळीराजाला पुढील १५ दिवसांत दिलासा मिळणार आहे.

केरळमध्ये नियोजित वेळेच्या चार दिवस आधीच मान्सून दाखल होत असून, यंदा चांगला पाऊस बरसणार आहे. मान्सून नियोजित तारखेच्या चार दिवस आधी म्हणजे दि. २७ मे रोजी केरळमध्ये येणार आहे. केरळमध्ये मान्सून १ जून रोजी दाखल होत असतो. परंतु हवामान अंदाजानुसार यंदा मान्सून २३ मे ते ३१ मे दरम्यान कधीही येऊ शकतो. अंदमान निकोबारमध्ये गेल्या वर्षी १९ मे रोजी मान्सून दाखल झाला होता. त्यानंतर केरळात ३० मे रोजी आला होता. परंतु, यंदा त्याच्या आधी २७ मे रोजीच येणार आहे. वेळेत पाऊस सुरु होणार असल्याने शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत.

याशिवाय जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्नही मार्गी लागण्यास मदत होणार आहे. गेल्या कित्येक वर्षातील पारनेर तालुक्यातील तापमान यंदा सर्वाधिक पहायला मिळाले. दुष्काळी भागात असल्याने उन्हाची तीव्रता सर्वाधिक जाणवली गेली.

अवकाळी पावसाने पारनेर तालुक्यासह टाकळीढोकेश्वर परिसरातील वासुंदे, वडगाव सावताळ, वनकुटे,तिखोल परिसरात अवकाळी पाऊस जोरदार झाला. पठार भागातील शेतकऱ्यांची भिस्त अवकाळी पावसावर अवलंबून असते पावसाने हजेरी लावल्याने शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत.

## जलसंधारण चळवळ शेतकऱ्यांच्या समृद्धीसाठी : सुजित झावरे
## काताळवेढा येथे पाझरतलाव खोलीकरण कामाचा शुभारंभ

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१३, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर तालुका हा दुष्काळी भाग म्हणून राज्यात ओळखला जातो परंतु या भागाचे नेतृत्व करत असताना या भागामध्ये जलसंधारणाची चळवळ गेल्या २० वर्षापासून आम्ही राबवत असून तालुक्यातील अनेक गावांमध्ये जलसंधारणाची कामे मार्गी लागली आहेत अनेक पाण्याच्या संदर्भातील प्रकल्प व त्यामुळे उभे राहिले असून या पुढील काळातही पारनेर तालुक्यात जलसंधारणाची चळवळ अविरत चालू ठेवणारा असून या योजनेचा मुख्य उद्देश म्हणजे पाझर तलावात साचलेल्या गाळाचे शास्त्रशुद्ध व्यवस्थापन करून त्याचा पुनर्वापर शिवारांमध्ये करणे. परिणामी जलसाठ्याची क्षमता वाढली जाते आणि गावातील पोषणमूल्ययुक्त माती शेतजमीनीत वापरून जमीनीची सुपीकता सुधारली जाते. हि योजना विशेषतः अल्पभूधारक व आर्थिकदृष्ट्या दुर्बल शेतकऱ्यांसाठी वरदान ठरली असल्याचे मत अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र शासनाच्या महत्वाकांक्षी ‘गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार’ योजनेच्या माध्यमातून मृद व जलसंधारण विभाग, अहिल्यानगर आणि संकल्प प्रतिष्ठाण यांच्या संयुक्त विद्यमाने काताळवेढा, पारनेर (ता. अहिल्यानगर) येथील पाझर तलावातील गाळ काढणे व खोलीकरणाच्या कामाचा शुभारंभ नुकताच झाला. या कामाचा प्रारंभ सुजित झावरे पाटील यांच्या शुभहस्ते, आमदार काशिनाथ दाते यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. गावातील शेतकऱ्यांची अनेक दिवसांपासून असलेली पाझर तलावातील गाळ काढण्याची मागणी अखेर पूर्ण झाली आहे. काही दिवसांपूर्वी गावातील ग्रामस्थांनी सुजित झावरे पाटील यांच्याकडे पाझर तलावातील गाळ काढण्याची मागणी केली होती.

या मागणीची तात्काळ दखल घेत अवघ्या आठ दिवसांत या समस्येचा प्रश्न मार्गी लावण्यात आला. ‘गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार’ योजनेंतर्गत पाझर तलावाच्या खोलीकरणाचे काम सुरू करण्यात आले आहे. या कामामुळे तलावाची पाणी साठवण क्षमता वाढणार असून, परिसरातील शेतकऱ्यांना याचा मोठा लाभ होणार आहे. तलावातील गाळ काढल्यानंतर पाण्याची उपलब्धता वाढेल, ज्यामुळे शेतीसाठी पाण्याचा प्रश्न सुटण्यास मदत होईल. तसेच, काढलेला गाळ शेतकऱ्यांच्या शेतात टाकून जमिनीची सुपीकता वाढवण्यासही हातभार लागणार आहे.

याप्रसंगी पंचायत समिती सदस्य अमोल साळवे, खंडू भाईक, राहुल गुंड,ठका कडुसकर, सोपान गुंड, संजय गुंड,सुदाम गाजरे, अजित भाईक, पोपट गुंड, शिवाजी डोंगरे,महादू भाईक, दिनेश वघा,शुभम सरोदे,म्हतारबा पवार,विकास गाजरे, प्रसाद झावरे यांच्यासह गावातील ग्रामस्थ उपस्थित होते.

## थोडक्यात

### न्यू इंग्लिश स्कूल पिलाणी विद्यालयाचा दहावीचा १०० टक्के निकाल



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१३, सातारा :** श्री समर्थ एज्युकेशन सोसायटी सोनवडी गजवडी संचलित न्यू इंग्लिश स्कूल पिलाणी मजरे ता.जि.सातारा या विद्यालयाचा शंभर टक्के निकाल लागला असून माध्यमिक शालांत प्रमाण परीक्षा मार्च २०२५ मधील प्रथम तीन क्रमांक आलेले विद्यार्थी साळुंखे प्रथमेश संपत ७८.२०%, कु.साळुखे जान्हवी हणमंत ७६.२८%, कु.साळुखे अंकित अरविंद ७५%असे आहेत. विद्यालयाने सलग नऊ वर्षे शंभर टक्के निकालाची परंपरा जोपासली आहे. हे विद्यालय अतिशय दुर्गम भागात डोंगरावर असून इथे खाजगी क्लासेस किंवा इतर शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध नाहीत तरी सुद्धा विद्यार्थी खूप अभ्यास करतात मेहनत घेतात शिक्षक त्यांना अतिशय चांगल्या प्रकारे मार्गदर्शन करत असतात. शाळेमध्ये ज्यादा तास सराव परीक्षा प्रत्येक विद्यार्थ्यावर वैयक्तिक लक्ष असा विद्यार्थी कडुन कसुन अभ्यास व सराव करून घेतला जातो. विद्यार्थी व शिक्षकांच्या कष्टाचे फळ म्हणजे शंभर टक्के निकालाची परंपरा होय. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे तसेच मार्गदर्शक मुख्याध्यापक खराते सर तसेच सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांचे शंभर टक्के निकालाची परंपरा जोपासल्या बद्दल संस्थेचे सर्व पदाधिकारी तसेच ग्रामस्थ, पालक, पठार विभागातून कौतुक व अभिनंदन केले जात आहे.

### पुठ्ठ्याने भरलेल्या टेम्पोला आग! केबिन जळून खाक



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि१२, तुर्भे (नवी मुंबई) :** तुर्भे नाका ट्रॅफिक पोलीस चौकीजवळ तुर्भे उड्डाणपुलाच्या खाली तुर्भेकडून पनवेलच्या दिशेने जाणाऱ्या, पुठ्ठ्याने भरलेल्या एमएच ४३ बीसी १२४२ या कंपनीच्या टेम्पोला आग लागून गाडीच्या आतील सर्व सामान संपूर्ण जळून खाक झाले आहे. आज दिनांक १२ मे २०२५ रोजी सायंकाळी ८ वाजून २५ मिनिटांच्या सुमारास आग लागली. आग लागताच ड्रायव्हर गाडी सोडून पळून गेला असून कोणतीही जीवित हानी झालेली नाही असे पोलिस ऑफिसर सतीश कदम यांनी सांगितले. आग लागल्याची माहिती पोलिसांनी त्वरित फायर ब्रिगेडला कळवली. नेरूळ एमआयडीसी फायर ऑफिसर सुमेध जाधव आणि त्यांच्या टीमने आग विझवली. तोपर्यंत ट्रॅफिक पोलिसांनी रस्त्यावरील वाहतूक सुरळीत करण्यासाठी प्रयत्न केले.

### जि. प. प्रशाला वडगाव (सि.) शाळेचा दहावी परीक्षेचा १०० टक्के निकाल

**सिद्धेश्वर महादेव क्षिरसागर ९२.४० टक्के गुणासह प्रशालेत प्रथम**



**अक्षराज : संगीता वनकळस**

**दि.१३, धाराशिव :** राज्य माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेचा दहावीचा निकाल आज मंगळवारी जाहीर झाला. या परिक्षेच्या निकालामध्ये जि. प. प्रशाला वडगाव ( सि ) तालुका धाराशिव या शाळेचा १००% टक्के निकाल लागला असून शाळेतील विद्यार्थी सिद्धेश्वर महादेव क्षीरसागर हा ९२.४०% गुण घेऊन शाळेत प्रथम आला आहे. तर द्वितीय पार्थ शांतीलाल जाधव ८६% गुण , तृतीय माधुरी मधुकर मुळे ७९.८०% टक्के गुण घेऊन उत्तीर्ण झाली आहे. प्रशालेचे ०७ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले असून प्रथम श्रेणीमध्ये सात विद्यार्थी व द्वितीय श्रेणीमध्ये चार विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन वडगाव चे भूमिपुत्र शिक्षण उपसंचालक डॉं. गणपतराव मोरे , शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सोमनाथ पाटील व सर्व सदस्य ,युवा नेते अंकुश काका मोरे , सदस्य गजेंद्र जाधव, सरपंच बळीराम कांबळे , उपसरपंच जयराम मोरे, प्रशालेच्या मुख्याधापिका ज्योती राऊत , शिक्षिका सरोजा पाटील, रजनी रावळे , सुचिता शेलार, निर्मला गुरव व शिक्षकेतर कर्मचारी भूषण मदने आदींसह गुरुजी विचार मंच व समस्त गावकऱ्यांच्या वतीने यशस्वी विद्यार्थी व शिक्षकांचे अभिनंदन केले आहे.

# संपादकीय

## उन्हाळी शिबिरांची उपयुक्तता किती असते?

वार्षिक परीक्षा संपून सुट्ट्या सुरू झाल्या की जिकडे तिकडे उन्हाळी शिबिरांची रेलचेल सुरू होते. प्रत्येक ठिकाणी गायन, वादन, नाट्य, अभिनय, नृत्य, साहसी खेळ जसे ट्रेकिंग, स्विमिंग अशा विविध विषयांशी निगडित शिबिरांचे आयोजन केले जाते. पालक ही आपल्या मुलांना परीक्षा संपल्या की उन्हाळी शिबिरात दाखल करतात. खरंतर उन्हाळी सुट्टीत मुलांनी मस्त मजा करावी, मित्र मैत्रिणींसोबत मनसोक्त खेळावे, बागडावे, मैदानी खेळ खेळावेत, आवडीची पुस्तके वाचावीत, मामाच्या गावाला किंवा खेडेगावात जाऊन निसर्ग अनुभवावा, गड किल्यांची भटकंती करावी. मुलांनी त्यांची सुट्टी एन्जॉय करावी. पण असे करण्याऐवजी पालक आपल्या मुलांना उन्हाळी शिबीराच्या दावणीला बांधतात.

मुलांचा कल, मुलांची आवड न पाहता पालक आपल्या मुलांना उन्हाळी दाखल करतात. वाढत्या स्पर्धेच्या युगात आपला मुलगा अभ्यासासोबतच इतर कलागुणांमध्येही मागे राहू नये म्हणून पालक आपल्या मुलांना उन्हाळी शिबिरात दाखल करतात पण ही उन्हाळी शिबिरं आपल्या मुलांसाठी किती उपयुक्त आहेत या उन्हाळी शिबिरांचा मुलांना खरंच उपयोग होतो का? याचा विचार मात्र पालक करीत नाहीत.

उन्हाळी शिबिरातील मुलांच्या सुरक्षेबाबत आयोजक गंभीर आहेत का याचाही विचार पालकांनी करावा कारण तीन वर्षांपूर्वी म्हणजे कोरोनाच्या आधी पुण्यात एका शिबिरात मुळशी धरणात पोहायला गेलेल्या तीन मुलांचा बुडून मृत्यू झाला होता. या घटनेमुळे उन्हाळी शिबिरातील मुलांच्या सुरक्षेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. पालकांनीही आपल्या मुलांना उन्हाळी शिबिरात दाखल करण्यापूर्वी शिबिरातील सुरक्षा व्यवस्थेची खात्री केली पाहिजे.

या शिबिरांना शासनाची मान्यता आहे का याचीही खात्री करायला हवी. सरकारनेही आयोजकांची क्षमता व सुरक्षा व्यवस्थेची पाहणी करूनच अशा शिबिरांना मान्यता द्यायला हवी. शिबिरादरम्यान जर काही दुर्घटना घडली तर त्या दुर्घटनेस आयोजकांनाच जबाबदार धरले पाहिजे.

काही शिबिरांना मिळणारा प्रतिसाद उत्स्फूर्त असतो तर काहींना अल्प प्रतिसाद मिळतो अर्थात या शिबिरातून सर्वच गोष्टी शिकायला मिळतात असे नाही. याउलट वर्षभर चालणाऱ्या विविध शिबिरातून मुलांना अनेक गोष्टी शिकायला मिळतात असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. सुट्टीच्या दिवसातील शिबिरांना बऱ्यापैकी पैसे मोजावे लागतात. टीव्ही, मोबाईल, व्हिडीओ गेममध्ये डोके खुपसून बसण्यापेक्षा पैसे जात असले तरी मुले गुंतून राहत असल्यामुळे पालक हाही खर्च सहन करतात. पालकांचा हेतू उदात्त आहे मात्र पालकांनी मुलांच्या आवडीनिवडी जपाव्यात. आपल्याला हवे तसे नको तर मुलांना हवे ते देण्याचा, शिकवण्याचा प्रयत्न करावा. एकूणच या शिबिरांची आपल्या मुलांना कितपत गरज आहे याचा विचार करूनच पालकांनी आपल्या मुलांना उन्हाळी शिबिरात दाखल करावे.

## ॲडमिशन . ..

| | |
|---|---|
| कितीही टक्केप्राप्त<br>तरीही वाटते कमी<br>मन सारखे कॉलेज<br>कसलीचं नाही हमी | शांत राही सरस्वती<br>आवाजां येई नरमी<br>शोभून दिसते सदैव<br>पूजा स्थानात लक्ष्मी |
| हवे होते मार्क जरा<br>चेह–यावरी बेशरमी<br>निकाल जणूं जुगार<br>तीन पत्त्यांची रमी | प्रवेश ते तावूनपाहून<br>सिस्टीम असेअक्षमी<br>कोण आला अव्वल<br>वाचाया गोड बातमी |
| सतत अभ्यास करी<br>विद्येची उतरे गरमी<br>डोनेशन ॲडमिशन<br>दावू लागली गुरमी | डाव जिंकेल थोडाचं<br>इतर पत्ते बिनकामी<br>राजाराणी जाणतात<br>पत्ता चालतो हुकमी |
| खूपमिळे डिस्काउंट<br>फी भरा एकरकमी<br>प्रवेश जाणा नक्की<br>असूदे रे टक्के कमी | कॉलेज हे अद्ययावत<br>कार्यक्रम एककलमी<br>उच्च शिक्षण व्यापार<br>होऊ नये अधोगामी |

- हेमंत मुसरीफ पुणे
मो. ९७३०३०६९९६

# रणझुंजार छत्रपती संभाजी राजे !

परकीय मुस्लिमांच्या आक्रमक धर्मवेडया वृत्तीमुळे लोक हवालदिल झाले होते.अत्याचार, जुलूम, खून,जाळपोळ लुटालुट,याहीपेक्षा भयंकर म्हणजे लेकी-सुनांनी भीती घेतली होती.देवळे पाडली जात होती. मुर्त्यांचे तुकडे-तुकडे केले जात होते.हे सगळं बघून देवमाणूस अस्वस्थ झाला. त्यांना देवाला हाक मारली.आदिशक्ती भवानीच्या दारावर थाप मारली.''दार उघड बये ! दार उघड ! आता दार उघड !'' गोंधळी,वासुदेव, वाघ्या मुरळी,तसेच संत एकनाथांचे वैचारिक नेतृत्व यातून भवानी मातेने एकनाथांची हाक ऐकली.जाणता राजा छत्रपती शिवाजींना धाडले.शिवाजी राजेंनी स्वराज्याची स्थापना केली.

राजे शिवछत्रपतींच्या पोटी पुरंदरावर युवराजच्या रूपाने १४ मे १६५७ रोजी स्वराज्य रक्षक जन्माला आला. छत्रपती शिवाजी राजे यांचे नाव जसे शिवनेरीच्या शिवाई देवीच्या आशीर्वादाने ठेवले. त्याचप्रमाणे भोसले घराण्यांच्या जुन्या स्मृतींवरून बाळ युवराज यांचे नाव ठेवले होते. शंभुराजे पहिले जिजाऊ माँ साहेबांचे चुलत दीर,हे खंडागळे हत्ती प्रकरणात मारले गेले. त्यावेळी जिजाऊ माँसाहेब गरोदर होत्या.पुढे त्यांना मुलगा झाला.आपल्या चुलत भावाची आठवण म्हणून शहाजीराजे यांनी त्यांचे नाव राजे संभाजी ठेवले. छत्रपती शिवाजी महाराज यांचे हे थोरले बंधू होते. परंतु दृष्टअफजल कडून ते कानगिरीच्या वेढ्यात पराक्रम करीत असताना मारले गेले.आणि योगायोग असा की,या घटनेनंतर राणी सरकार सईबाईंना मुलगा झाला. आपलाच थोरला मुलगा आपल्याच घरात परत आला म्हणून, जिजाऊ माँसाहेबांनी बाळ युवराज यांचे नाव ठेवले संभाजी राजे...!जिजाऊ माँ साहेबांचे शंभूराजेंवर खूप प्रेम होते.शंभूराजेंच बालपण तसं खडतरच होतं. आयुष्यातल्या संघर्षाची सुरुवात बाल वयातच झाली. त्यात दैवालाही दृष्टपणा करायचा होता म्हणून शंभूराजे अवघे सव्वा दोन वर्षाचे असताना त्यांच्या आईसाहेब देवाघरी गेल्या.आईविना मूल ! बाळाची आजीच आई झाली.जिच्या अंगा खांद्यावर छत्रपती शिवाजीराजे वाढले आणि त्याच अंग खांद्यावर संभाजी राजे वाढले.जो आदर्श संस्कार छत्रपती शिवाजी राजेंवर झाला तोच संस्कार माँ जिजाऊसाहेबांच्या च्या रूपाने छत्रपती संभाजीराजेंवर झाला. जिजाऊ माँसाहेब छत्रपती शिवरायांप्रमाणेच शंभूराजेंना रामायण, महाभारताच्या गोष्टी सांगत असत. याबरोबर धनुर्विद्या,घोडदौड,भालाफेक, तलवारबाजी आणि युद्ध शास्त्राचे नियम शंभूराजे बालवयापासून शिकत होते. छत्रपती शिवरायांचा स्वराज्य विस्तार वाढत असताना धूर्त खेळी करून आदिलशहाने १६४९ मध्ये राजे शहाजींना कैद केले.पित्याच्या कैदीतून सुटकेसाठी शिवरायांना मिर्झाराजांच्या मध्यस्थिने आदिलशहा बरोबर पुरंदरचा तह करावा लागला. त्यामध्ये २३ किल्ले व लाखोंची खंडणी द्यावी लागली. पुन्हा मिर्झा राजाने एक जाळ टाकलं. औरंगजेबाकडून शंभू राजांना मनसबदारी बहाल केलाचा स्वीकार करण्याचा हुकूम दिला.तो तहाचा एक भाग असल्यामुळे बाळ संभाजी राजे वयाच्या आठव्या वर्षी औरंगजेब छावणीत दाखल झाले. एवढ्याकोवळ्या वयात मौजमजा करण्याच्या वयात या पराक्रमी राजाच्या नशिबात असा संघर्षच संघर्ष होता.पण तो छावा होता छत्रपती शिवरायांचा....! तिकडे औरंगने पित्याला कैदेत टाकून स्वयंघोषित बादशहा म्हणून घोषित केले व सिंहासरावर विराजमान होण्यासाठी उत्सव आयोजित केला.या उत्सव प्रसंगी हजर राहण्यासाठी औरंगजेबने मिर्झाराजामार्फत शिवाजी राजेंना निमंत्रण दिले.आगऱ्याच्या दरबारात छत्रपती शिवाजी राजे व बाळ शंभूराजे उपस्थित झाले.मात्र तेथे शिवरायांचा अपमान झाला. महाराज गरजले, ''चाहे मेरा सिर काटकर ले जाओ,मै पातशहा की हुजुरी नही मानता''शिवाजी राजांचा हा स्वाभिमान शंभूराजांनी डोळ्यांनी बघितला व आयुष्यभर पिताश्रींच्या विचारांची कास धरली.व कधीच कुणासमोर शरण गेला नाही.एव्हाना मृत्यू समोरही..! मृत्युंजय...!मात्र क्रूर भावनेतून औरंगने शिवाजीराजे व संभाजीराजे यांना कैद केले. कैदेतून सुटका करून महाराज मायभूमी परतले.मात्र संभाजीराजांच्या सुरक्षिततेसाठी त्यांना मथुरेत काशीपंतांकडे ठेवले.राजे राजगडावर पोहोचल्यावर त्यांनी मुद्दाम हेतू पुरस्कार बातमी पसरवली की, शंभुराजे वाटेतच हे जग सोडून गेले.म्हणून त्यांचे श्राद्ध घातले. हो जिवंतपणी श्राद्ध...! असा एकमेव पराक्रमी राजा कि,केवळ स्वराज्यासाठी त्यांना ह्या सर्व कसोटीतून बाहेर पडावे लागले. छत्रपती शिवाजी राजेंच्या मृत्यूनंतर ज्येष्ठ पुत्र म्हणून राजे संभाजी राजे यांचा राज्याभिषेक करण्यात आला.यावेळेस सुद्धा राजे संभाजींना कौटुंबिक कलहांचा सामना करावा लागला. स्वराज्याचे थोरले धनी गेल्यावर राज्यकारभारामध्ये अंतर्गत कलह निर्माण होऊन दोन गट निर्माण झाले. शिवाजी राजेंनी कष्टाने उभं केलेल्या स्वराज्यातील अंतर्गत कलहामुळे मुघलांना कुरूघोड्या करण्यास संधी मिळाली.म्हणून आबासाहेबांनी मिळवलेल्या स्वराज्याचे रक्षण करण्यासाठी संभाजी राजेंना काही कठोर निर्णय घ्यावे लागले.ह्या कुरघोड्यांचा कायमचा बंदोबस्त करण्यासाठी अण्णाजी दंतोसारख्यांना हत्तीच्या पायी द्यावी लागले. एकसंघता निर्माण करावी लागली. नाही तर स्वराज्य खिळ-खिळ झाले असते.तिकडे मुघली परंपरेप्रमाणे औरंगजेबाचा मुलगा शहजादा अकबरने बादशहापणाच्या लालसेपोटी पिता औरंगजेबाविरुद्ध



कुरघोड्या करण्यास सुरुवात केली.त्यासाठी तो राजेसंभाजींकडे आश्रयास आला. संभाजी राजेंच्या पाठिंब्यामुळे शहजादा अकबराने औरंगविरुद्ध बंड पुकारल्यामुळे औरंगजेब घाबरला कारण, राजे संभाजींच्या शौर्याची आणि पराक्रमाची कल्पना औरंगला होती म्हणून, तो दिल्ली सोडून, मराठा राज्य व शहजादा अकबराचा बंदोबस्त करण्यासाठी दक्षिणेकडे निघाला.बऱ्हाणपूरच्या दर्ग्यासमोर नत होऊन शंभूराजांना संपवण्यासाठी प्रतिज्ञा केली.धर्मवेड्या औरंगजेबाने धर्मयुद्धच पुकारले तीन लक्ष घोडदळ, चार लक्ष पायदळ, बेसुमार तोफा, दारूगोळा, शस्त्रे, उंट, हत्ती व खजिना घेऊन शंभूराजे विरुद्ध युद्ध पुकारले मात्र हा सिंहाचा छावा जुमानतो कसला?राजेंनी त्याला चहूबाजूने उपद्रव दिला.शंभूराजे मैदानात स्वतः लढत होते.त्यांच्या नेतृत्वांची धार मोघलांना कापत होती.अवघ्या चौवीशीतील संभाजी राजेंनी त्रेसष्ट वर्षाच्या औरंगला जर्रजर करून सोडले होते.युद्ध आणि पराक्रम म्हणजे राजे संभाजी हे सूत्र झाले होते. संभाजी राजेंना संपवण्यासाठी आलेल्या औरंगजेची पूर्ण निराशा झाली होती. भगवा अभिमानाने आकाशात फडकत होता.छत्रपती शिवाजी राजेंनी स्वराज्य रक्षणाची सोपवलेली जबाबदारी संभाजी राजे अगदी कटाक्षाने पाळत होते.हे त्यांच्या नेत्रदीपक झुंजीतून दिसून येत होते.

संभाजी राजेंनी औरंगजेबाला इतकं जखडून ठेवलं की, शेवटी तो हातबल झाला. पराभवाच्या धक्क्यांनी वेडा झालेल्या औरंगने शेवटी फितुरीचे शस्त्र वापरले. प्रथम आदिलशाही, कुतुबशाही कडे वळला. शहजादा अकबर इराणकडे पळून गेला. राजपुतांनी थोड्याशा अमिषा पोटी मराठ्यांची साथ सोडली.शंभूराजे मुघलांविरुद्ध एकटे लढत होते.हंबीरराव मोहिते,रूपाजी भोसले, संताजी जगताप,रायाजी सामराज, कवी कलश मुघलांवर तुटून पडत होते. वाई येथे मोगल व हंबीरराव समोरासमोर आले असता,अटीतटीच्या झुंजीत त्यांच्यासोबत घात झाला व शूर सेनापती हंबीरराव मोहिते गतप्राण झाले,तेव्हा मात्र संभाजीराजे खूप एकटे पडले.फितूरतेला मराठा बळी पडू लागले. रामशेज, साल्हेर औरंगजेबने गिळले. फितुरीचा अंमल वाढत होता. राजेंच्या थोरल्या बहिणीचे यजमान महाडिक,मेव्हणे शिर्के बंधू मोघलांना जाऊन मिळाले तेव्हा, मात्र राजे हताश झाले. स्वराज्याचं आभाळ फितुरीने फाटलं गेलं.फितुरी बोकाळली व राजे एकाकी पडले.संगमेश्वरला विसाव्यास असलेले कवी कलश व राजे संभाजी यांना शिर्क्यांनी घात करून पकडून दिले. स्वराज्याचा तेजस्वी सूर्य फितुरीने गिळला गेला. ज्या शेर संभाजीला पकडण्यासाठी आठ लाख सैन्य, घोडदळ,पायदळ,प्रचंड तोफगोळा,नामांकित सरदार व संपूर्ण दिल्लीची सत्ता नऊ वर्ष लढत होती. त्या मोघलांना शंभुराजे शस्त्राने,युद्धनीतीने,निधड्या छातीने मिळाले नाहीतर, महापराक्रमी राजाला पकडले ते नपुंसकापरी फितुरीच्या शस्त्राने....! फितुरीचे शस्त्र धैर्य,शौर्य आणि तेज यांना दूर ठेवते. फितुरीचे शस्त्र हे एक शाप आहे ! धोका आहे ! ते शस्त्र फक्त पळपुटे,भित्रे आणि नीच प्रवृत्तीचेच लोक वापरतात. संभाजी राजेंना व कवी कलश यांना साखळदंडात अडकवले गेले. विदुषकापरी मिरवणूक काढली गेली कारण,शृंखलेविना शंभूराजे असते तर,त्या क्षणी सुद्धा या छाव्याने पराक्रमाची इतिहासात गाथा रचलली असती. परंतु, दुर्दैव...! असो! चाळीस दिवस हाल-हाल करून राजे संभाजींचा फाल्गुन वद्य अमावस्येला म्हणजेच गुढीपाडव्याच्या एक दिवस अगोदर वध केला. छत्रपती संभाजी राजे स्वाभिमानी,बाणेदार आणि कट्टर धर्माभिमानी होते.धैर्य,शौर्य आणि तेज म्हणजेच छत्रपती संभाजी राजे ! राजेंच्या वीरमरणाने हिंदूराष्ट्राला एक नवीन दिशा मिळाली आणि त्यांच्या पराक्रमाच्या शौर्याच्या रूपाने पुन्हा मराठी अस्मिता,निष्ठा व पराक्रमासाठी राजांच्या विचारांचे स्वराज्य उभे राहिले. मात्र मराठी दौलतीला संपविण्याचे औरंगजेबाचे स्वप्न कधीच पूर्ण होऊ शकले नाही. स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी राजे यांचे जीवन म्हणजे एक महायज्ञ होता.संपूर्ण आयुष्याची स्वराज्य रक्षणासाठी महायज्ञात त्यांनी आहुती दिली. आपल्या बत्तीस वर्षाच्या छोट्या आयुष्यात त्यांनी तेजोवलय तयार केले.नऊ वर्षाच्या कारकिर्दीत ऐकशे अठ्ठावीस लढाया लढल्या.त्यापैकी चाळीस तुंबळ युद्धाच्या स्वरूपात लढले. मात्र कधी पराभव स्वीकारला नाही.औरंगसमोर हा छावा शेवटच्या श्वासापर्यंत कधीच झुकला नाही. त्यांच्या बलिदानानं इतिहासात नवे पर्व सुरू झाले.

स्वराज्यरक्षक,महापराक्रमी योद्धा राजे संभाजी यांना जयंतीनिमित्त शतशः नमन,मानाचा मुजरा व विनम्र अभिवादन....!

**श्री.विनोद शेनफड जाधव**
**मासरूळ जि.बुलडाणा**
**मो.९७६३२८२०७७**

# एका विराट युगाचा अंत!

क्रिकेटचा किंग, चेस मास्टर, विक्रमवीर, रन मशिन यासारखी अनेक बिरुदावली ज्याच्या नावापुढे लागली आहेत तो भारताचाच नव्हे तर जगातील सर्वोत्तम फलंदाज, भारताचा कोहिनूर विराट कोहलीने कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती स्वीकारीत असल्याची घोषणा सोमवारी केली आणि संपूर्ण क्रिकेट विश्व हळहळले. मागील आठवड्यात रोहित शर्मा या भारताच्या माजी कर्णधारानेही कसोटीतून निवृत्ती स्वीकारली होती तेंव्हा पासून विराटच्या निवृत्तीची चर्चा होऊ लागली होती मात्र आगामी इंग्लंड दौऱ्यात विराट खोऱ्याने धावा काढेल आणि मगच कसोटीतून निवृत्त होईल अशी अपेक्षा क्रिकेट चाहत्यांना होती मागील दोन वर्षात विराट कोहली कसोटीत अपेक्षित कामगिरी करू शकला नसला तरी आगमी इंग्लंड दौऱ्यात तो चांगली कामगिरी करून संघाला विजय मिळवून देईल अशी अपेक्षा असतानाच त्याने कसोटीतून निवृत्तीची घोषणा केल्याने क्रिकेट चाहत्यांना मोठा धक्का बसला आहे. रोहित शर्मा पाठोपाठ विराट कोहलीनेही कसोटी क्रिकेटला रामराम केल्याने भारतीय संघाला त्याचा मोठा फटका बसणार आहे. कारण रोहित आणि विराट या दोघांनी मिळून मागील चौदा वर्षात भारताला अनेक अविस्मरणीय विजय मिळवून दिले आहेत. भारतीय क्रिकेटचे जय विरू असलेल्या या दोन ज्येष्ठ खेळाडूंच्या निवृत्तीचे कसोटी क्रिकेटमधील ' रोको ' युग संपले असे म्हणावे लागेल. निवृत्त कधी होणार आहात? , असे विचारण्याआधीच निवृत्ती घेणे योग्य असते असे उदगार दिग्गज कसोटीपटू विजय मर्चंट यांनी निवृत्तीच्या अनुषंगाने काढले होते. कधी जाणार ? असे क्रिकेट चाहत्यांनी विचारण्यापेक्षा का गेलास ? असे विचारणे केंव्हाही चांगले असा विचार करूनच कदाचित या दोघांनी निवृत्ती स्वीकारली असेल. काहीही असो मात्र या दोघांच्या निवृत्तीचे कसोटीतील एका युगाचा अंत झाला असेच म्हणावे लागेल. क्रिकेट या खेळाने जगाला अनेक महान खेळाडू दिले. सचिन तेंडुलकर हा त्यापैकीच एक महान खेळाडू. क्रिकेटमधील दैदिप्यमान कामगिरीने तो क्रिकेटचा देव बनला. जवळपास दोन तप त्याने क्रिकेटवर अधिराज्य गाजवले. भारताला अनेक अविश्वसनीय विजय त्याने मिळवून दिले. २०१३ साली त्याने निवृत्ती स्वीकारली. निवृत्ती स्वीकारण्यापूर्वी त्याने विक्रमांचे एव्हरेस्ट गाठले. तो निवृत्त झाल्यावर त्याच्या इतक्या क्षमतेचा खेळाडू पुन्हा भारताला मिळेल का ? असाच प्रश्न संपूर्ण क्रिकेट विश्वाला पडला होता. ज्या प्रश्नाचे उत्तर कोणाकडेच नव्हते त्या प्रश्नाचे उत्तर खुद्द सचिनकडे होते. सचिनला जेंव्हा प्रश्न विचारण्यात आला की तुझा विश्वविक्रम कोणता खेळाडू मोडेल असे तुला वाटते तेंव्हा त्याने क्षणाचाही विलंब न करता उत्तर दिले 'विराट कोहली' सर्वांना त्यावेळी ही अतिशोक्ती वाटली पण सचिनने विराटची गुणवत्ता हेरली होती. निवृत्त होण्यापूर्वी चार पाच वर्ष तो आणि विराट एकत्र खेळले होते त्यामुळे विराट कोणत्या क्षमतेचा खेळाडू आहे आणि तो काय करू शकतो हे सचिनला माहीत होते त्यामुळेच सचिनने आपला वारसदार म्हणून विराटची निवड केली होती. विराटने सचिनचे म्हणणे अवघ्या दहा वर्षात खरे करून दाखवले आणि सचिनचा विश्वास सार्थ ठरविला. आज विराटने देखील सचिन प्रमाणे विक्रमांचे इमले चढले आहेत इतकेच नाही तर सचिनचे अनेक विक्रम त्याच्या दृष्टिक्षेपात होते. सचिनच्या १०० शतकांचा विक्रम विराट लवकरच आपल्या नावे करेल असेच सर्वांना वाटत होते त्याच्या नावे ८२ शतके आहेत. कसोटीत त्याने ३० शतके झळकावली आहेत त्यामुळेच त्याच्याकडून ही अपेक्षा व्यक्त केली जात होती आज तो ३७ वर्षाचा होत आहे. त्याचा फिटनेस जबरदस्त आहे. वीस वर्षाचा खेळाडू देखील त्याच्यासमोर फिका पडेल असा त्याचा फिटनेस आहे त्यामुळे तो आणखी दोन तीन वर्ष सहज खेळू शकला असता. त्यामुळे त्याने हा विक्रम सहज मोडला असता मात्र त्याने विक्रमांचा विचार केला नाही. सचिन नंतर सर्वाधिक शतके विराटच्याच नावावर आहेत. विराट केवळ विक्रमवीर बनला नाही तर तो आज जगातला महान फलंदाज बनला आहे. उत्तम खेळाडू ते महान खेळाडू बनण्यापर्यंतचा त्याचा प्रवास अचंबित करणारा आहे. अवघ्या दहा वर्षात तो आज जगातला महान खेळाडू बनला आहे. त्याने धावांची टांकसाळ उभारली आहे. प्रत्येक सामन्यात तो खोऱ्याने धावा काढत आहे. त्याची बॅट म्हणजे जणू धावांची मशिन, त्याच्या बॅट मधून धावांची बरसात होत आहे म्हणूनच आकाश चोप्रा त्याला ' विराट द रन मशिन कोहली 'असे म्हणतो. त्याने काढलेल्या शतकांपैकी ९५ टक्के शतके भारताच्या विजयास कारणीभूत ठरली आहेत यावरून त्याच्या शतकांचे मोल लक्षात येते. धावांचा पाठलाग करताना तर त्याने सर्वाधिक शतके झळकावली आहेत म्हणूनच त्याला चेस मास्टर असेही म्हंटले जाते. विराटने शतक झळकावले म्हणजे भारत विजयी झाला असेच समीकरण बनले आहे. केवळ शतकच नव्हे तर त्याच्या अनेक छोट्या मोठ्या खेळी भारताला विजय मिळवून देणाऱ्या ठरल्या. भारताला अनेक अविश्वसनीय विजय त्याने मिळवून दिले आहेत. ऑस्ट्रेलियामध्ये झालेल्या टी २० विश्वचषक स्पर्धेतील पाकिस्तान विरुद्धचा सामना आठवा. आपण तो सामना केवळ विराटमुळे जिंकू शकलो. हातातून गेलेला सामना त्याने ज्याप्रकारे खेचून आणला ते पाहून प्रेक्षकांच्या डोळ्यांचे पारणे फिटले. तशी खेळी फक्त आणि फक्त विराटच खेळू शकतो ती खेळी म्हणजे फक्त एक उदाहरण आहे. तशा प्रकारच्या अनेक खेळी करून त्याने भारताला अनेक अशक्यप्राय विजय मिळवून दिले आहेत. कठीण समय येता विराट कामी येई.... असे उगीच क्रिकेटप्रेमी म्हणत नाहीत. भारतीय कसोटी क्रिकेटचा तर खारखरा राजदूत होता. कसोटीत त्याने ३० शतके आणि ३१ अर्धशतके झळकावली आहेत. इतकेच नाही तर कसोटीत त्याने तब्बल ७ द्विशतके झळकावली आहेत. कसोटीत त्याने एकूण ९,२३० धावा काढल्या आहेत त्यात २५४ ही त्याची सर्वोच्च धावसंख्या आहे. इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, न्युझीलंड, दक्षिण आफ्रिका, वेस्ट इंडिज, श्रीलंका, बांगलादेश अशा सर्वच देशात त्याने शतके झळकावली आहेत. केवळ फलंदाज म्हणूनच नाही तर कर्णधार म्हणूनही त्याने देशासाठी सर्वोत्तम कामगिरी केली आहे. भारताचा कसोटीतील सर्वात यशस्वी कर्णधार म्हणून विराटचीच नोंद होते. त्याच्या नेतृत्वाखाली भारताने तब्बल ४० कसोटी सामने जिंकले आहेत. कर्णधार म्हणून त्याने ६८ कसोटीत भारताचे नेतृत्व केले. ६८ कसोटीत ४० विजय मिळवणारा विराट कोहली हा कसोटीतील भारताचा सर्वोत्तम कर्णधार ठरला आहे. त्याच्या नंतर महेंद्रसिंह धोनीचा नंबर लागतो त्याने भारताला २७ कसोटीत विजय मिळवून दिले आहेत. विराटच्या नेतृत्वाखाली भारताने सलग ९ कसोटी मालिका जिंकल्या आहेत. अशी कामगिरी फक्त ऑस्ट्रेलियाच्या रिकी पॉंटिंगलाच करता आली आहे. आजच्या टी २० च्या युगात त्याने कसोटी क्रिकेटला नेहमीच प्राधान्य दिले आहे. कसोटी क्रिकेट हेच खरे क्रिकेट असे तो नेहमी म्हणायचा म्हणूनच कसोटीत भारताला विजय मिळावा यासाठी तो सर्वस्व पणाला लावायचा. कसोटी सामना जिंकण्यासाठी जी जिगर लागते जो संयम लागतो तो ग्याच्यकडे होता म्हणूनच तो कसोटी क्रिकेटचा खराखुरा राजदूत होता. त्याची ती जिगर, तो संयम आता पुन्हा दिसणार नाही. पांढऱ्या जर्सी मध्ये तो पुन्हा मैदानात उतरणार नाही याची रुखरुख क्रिकेट चाहत्यांना कायम राहणार आहे असे असले तरी त्याने गेल्या १४ वर्षात भारतीय कसोटी क्रिकेटची जी सेवा केली आहे ती क्रिकेट चाहते कधीही विसरू शकणार नाही.

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात

### उद्धव बा. ठाकरे पक्षातर्फे खारघर येथे सुसज्ज बस थांब्याची मागणी




**अक्षराज : देवयानी कुलकर्णी**

**दि. १३, पनवेल (रायगड) :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खारघर उपशहर प्रमुख नंदु वारुंगसे यांनी खारघर मधील सेलिब्रेशन सेक्टर १७, सेक्टर १६ वास्तू विहार, स्पॅगिटी डि.ए.व्ही स्कूल समोरील सेक्टर १५ , घरकुल गेट समोरील सेक्टर १५ , डी मार्ट समोरील सेक्टर १५ खारघर या मार्गावरील बस थांब्याची पाहणी केली.

सदर बस थांबे हे गंज चढून जीर्ण झाले आहेत. तसेच त्यांचे पत्रेही उडून गेले आहेत व बाजूचे सपोर्ट ही गंजामुळे खराब होऊन निखळून पडत आहेत. तसेच दिवसातून हजारो प्रवासी तथा स्कूल, कॉलेजमधील विद्यार्थी येथून बसने ये - जा करत असतात, त्यामुळे दिलेल्या ठिकाणचे बस थांबे हे प्रवाशांना व विद्यार्थ्यांना बस ची वाट बघण्यासाठी उपयुक्त असतात. बसमध्ये सुरक्षितपणे चढण्यासाठी आणि उतरण्यासाठी हे थांबे निश्चित ठिकाणी आवश्यक असतात त्यामुळे प्रवाशांचे आणि विद्यार्थ्यांचे हाल होणार नाहीत, तसेच याव्यतिरिक्त, या मार्गाच्या बाजूला मोठ्या प्रमाणात स्कूल, कॉलेजेस असल्यामुळे मुलांना येण्याजाण्यासाठी अडथळा होणार नाही या विचाराने या मार्गावर दिलेल्या ठिकाणी बस थांबा अति महत्त्वाचा असल्यामुळे व बस थांबा विद्यार्थ्यांना व प्रवाशांना बसची वाट पाहत असताना सुरक्षितपणे थांबण्यासाठी आणि गर्दी टाळण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. नवीन सुसज्ज बस थांबे बसवल्यावर सदर बस थांब्यावर प्रवाशी व विद्यार्थी बसची वाट पाहत असताना बसुही शकतात. बस थांब्यावर बसण्यासाठी जागा व छत असल्यामुळे प्रवाशांना व विद्यार्थ्यांना, येणाऱ्या पावसाळ्या पासुन आणि हवामानापासून तसेच उन्हापासूनही संरक्षण मिळू शकेल. त्यामुळे या मार्गांवर पनवेल महानगरपालिकेच्या माध्यमातुन सुसज्ज असे बस थांबे लवकरात लवकर उभारण्यात यावे, अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खारघर उपशहर प्रमुख नंदु वारुंगसे यांनी पनवेल महानगरपालिकेकडे रीतसर विनंती पत्राची प्रत देऊन केली आहे.

### जागतिक परिचारिका दिनानिमित्ताने आरसीएफ मधील परिचारिकांचा सन्मान



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१३, नवी मुंबई :** राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टिलायझर्स मधील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या आरसीएफ एक्स एम्प्लॉईज सोशल फोरम संस्थेतर्फे आरसीएफ हॉस्पिटल मध्ये कार्यरत असलेल्या परिचारिकांचा जागतिक परिचारिका दिनाच्या निमित्ताने विपणन संचालक निरंजन सोनक यांच्या हस्ते पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन यथोचित सन्मान करण्यात आला. याप्रसंगी आरसीएफ चे भूतपूर्व अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक उदय शंकर झा, उपमहाव्यवस्थापक श्रीमती डॉ. रेखा देवाडिगा,जितू खानचंदानी, फोरमचे अध्यक्ष व्ही. डी. पाटील, डी. टी. बारकुंड, प्रभाकरराव साळुंखे, सुबोध मोरजकर, दीपक सालवणकर, सुभाष हांडे देशमुख तसेच दवाखान्यातील कर्मचारी वर्ग उपस्थित होता. फोरमच्या कार्याचे कौतुक करतांना श्री. सोनक म्हणाले की, आज बुद्ध पौर्णिमा आहे,खूप चांगला दिवस आहे या दिवशी तुमच्या सेवेचा गौरव करण्याचा योग आला ही खूप आनंदाची बाब आहे,

रुग्णांसाठी तुम्ही फक्त औषध देणाऱ्या परिचारिका नसता तर त्यांचं मनोबल वाढविणारी, त्यांचे अश्रू पुसणारी व आजारातून बरे होण्याची प्रेरणा देणारी एक शक्ती आहात. हे आपण करीत असलेल्या मानवसेवेने वेळोवेळी अधोरेखित झाले आहे. यावेळी उदय शंकरच झा म्हणाले की, रुग्णसेवा हे एक व्रत आहे,त्याचे पालन तुम्ही जबाबदारीने करता आहात. फ्लॉरेन्स नाइटिंगेल यांच्या आदर्शावर चालत तुम्ही समाजात आपले एक स्थान निर्माण केले आहे. रुग्णसेवेप्रति आपले योगदान मोलाच आहे.या प्रसंगी डॉ . रेखा देवाडिगा, यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीस व्ही. डी. पाटील यांनी प्रास्ताविक करून फोरमच्या कार्याची माहिती देऊन आजच्या कार्यक्रमाचा उद्देश स्पष्ट केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुभाष हांडे देशमुख यांनी केले, तर दीपक सालवणकर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

### सलग १५ व्या वर्षी जीनियस स्कूलचा १००% टक्के निकाल

**अक्षराज : राहुल शिंदे**

**दि.१३, पेठवडगाव (कोल्हापूर) :** पेठ वडगाव येथील जीनियस इंग्लिश मीडियम स्कूल चा माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेत निकाल शंभर टक्के लागला असून प्रथम क्रमांक - अक्षरा राणे पाटील - ९७.६०%, द्वितीय क्रमांक: प्रीती यादव ९३.६०%, तृतीय क्रमांक: श्रुती शिंदे ९१.२०%, चतुर्थ क्रमांक: अवधूत चव्हाण ८९.२०%, पाचवा क्रमांक: मृणाल डोईजड ८८.२०%, पाचवा क्रमांक: प्रथमेश हेंगाना ८८.८०%, सहावा क्रमांक: सहेर मोमीन ८८.००%, सातवा क्रमांक: साक्षी माळी ८७.८०% , आठवा क्रमांक: साईराज पाटील ८६.८०%, नववा क्रमांक : आर्यन सिसाळे ८५.४०%, दहावा क्रमांक: सत्यजित शिर्के ८३.४०%. चेअरमन महेश पोळ, प्राचार्या अर्पना पोळ, पुनम गुरव, सविता काटकर,तरनुम पटेल. यांचे सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन मिळाले.

# राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेत जयहिंद स्पोर्ट क्लब श्रीरामपूर, संघाने पटकाविला प्रथम क्रमांक




**अक्षराज : अशोक कुलकर्णी**

**दि.१३, कळंब (धाराशिव) :** युवक आघाडी शिवजयंती उत्सव समिती कळंब,जिल्हा धाराशिव २०२५ व महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन व धाराशिव जिल्हा कबड्डी असोसिएशन यांच्या मान्यतेने राज्यस्तरीय खुला गट पुरुषांची निमंत्रित कबड्डी स्पर्धा दिनांक १०, ११ व १२ मे २०२५ रोजी छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुल बार्शी रोड, कळंब येथे संपन्न झाली या स्पर्धेत प्रथम बक्षीसाचा मानकरी जयहिंद स्पोर्ट क्लब श्रीरामपूर संघास पहिले बक्षीस ५१ हजार रुपये कै. सुरेश हारकर यांच्या स्मरणार्थ फिरता चषक, मा. उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे महाराष्ट्र राज्य यांच्या ६१ निमित्त मा. अजित (दादा) पिंगळे यांच्या सौजन्याने तर द्वितीय क्रमांकाचा मानकरी म्हणून आझाद क्रीडा मंडळ अहिल्यानगर संघास रोख दुसरे बक्षीस ३१ हजार रुपये कै. तुकाराम ( दादा ) कदम यांच्या प्रित्यर्थ चषक ,मा.डॉ. संदीप तांबारे व सुरेश आळणे यांच्या सौजन्याने २१ हजार रुपये व १० हजार रुपये बक्षीस तर तृतीय स्वराज्य क्रीडा मंडळ भूम या संघास कै. दिलीप जावळे यांच्या प्रित्यर्थ चषक, शशिकांत निरपळ यांच्या सौजन्याने २१००० रुपये रोख बक्षीस देण्यात आले याचबरोबर उत्कृष्ट पकड संदेश देशमुख, शारदा क्रीडा मंडळ गेवराई रोख बक्षीस (२५०१ ) हरिश्चंद्र चोंदे यांच्या स्मरणार्थ उत्कृष्ट चढाई आदित्य गडाख आझाद क्रीडा मंडळ अहिल्यानगर ,(२५०१) विलास थोरात यांच्या स्मरणार्थ, अष्टपैलू खेळाडू म्हणून निलेश वरे स्वराज्य क्रीडा मंडळ भूम ( ५००१ ) संपतराव गायकवाड यांच्या स्मरणार्थ दिवसाचा सामनावीर युवराज गवारे, जय हिंद स्पोर्ट क्लब श्रीरामपूर (२५०१) कै. बशीर ( दौला ) मणियार यांच्या स्मरणार्थ रोख बक्षीस , वरील सर्व वैयक्तिक बक्षीस माननीय पांडुरंग कुंभार यांच्या सौजन्याने देण्यात आली तसेच याप्रसंगी उत्कृष्ट खेळाडू म्हणून अभी पवार अहिल्यानगर , महारुद्र गर्जे ,महासांगवी- पाटोदा यांचा सत्कार करण्यात आला मॅटवर खेळविल्या गेलेल्या या स्पर्धेत राज्यातून १५ संघाने सहभाग घेतला, स्पर्धेचे बक्षीस वितरण स्पर्धेचे संयोजक - युवक आघाडी अध्यक्ष यशवंत दशरथ, काँग्रेस आणि (आय ) पक्षाचे तालुकाध्यक्ष पांडुरंग (तात्या ) कुंभार, धाराशिव जिल्हा कबड्डी असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष लक्ष्मण तात्या मोहिते, फ्रेंड्स फोरेव्हर ग्रुपचे डॉ अभिजीत लोंढे, क्रीडा प्रशिक्षक सुबराव कांबळे, प्रा.साजेद चाऊस, फुलचंद कदम , महाराष्ट्र कबड्डी असोसिएशनचे माजी प्रदेश उपाध्यक्ष महादेव साठे , यांच्या हस्ते खेळाडूंना ट्रॉफी, स्मृती चिन्ह , पुष्पगुच्छ व रोख बक्षीस देण्यात आले प्रसंगी खेळाडूंचे स्वागत फ्रेंड्स फोरेव्हर ग्रुपचे राहुल कवडे, दिनेशअष्टेकर, उदय खंडागळे, परमेश्वर मोरे, युवक आघाडी व क्रीडा मंडळाच्या वतीने गजानन चोंदे, रवी उबाळे, जगदीश गोरे, अनिल कुलकर्णी , माधवसिंग राजपूत , रत्नदीप उबाळे, विश्वजीत वेदपाठक यांनी केले या स्पर्धेसाठी पंच म्हणून मोहन पाटील, निखिल हुंबे, दत्तात्रेय जावळे , (धाराशिव ) संग्राम मोहिते, रमेश मोहिते, अनिल शिंदे, राजाभाऊ शिंदे, रमेश माळी, संतोष चव्हाण, लालबा कावळे, यांनी काम पाहिले.

स्पर्धा यशस्वी करण्यासाठी ऋषिकेश दशरथ,पवन वेदपाठक, अतुल पाटील, प्रसन्न हुलसुलकर, यांनी परिश्रम घेतले.

## रिदमिक जिम्नॅस्टिकमध्ये महाराष्ट्राचा डबल धमाका परिना मदनपोत्रा सुवर्ण, तर शुभश्री मोरेला रौप्य




**अक्षराज : प्रतिनिधी**

**नवी दिल्ली :** अपेक्षेप्रमाणे महाराष्ट्राने सातव्या खेलो इंडिया स्पर्धेत जिम्नॅस्टिक चकमदार कामगिरी करीत रिदमिक जिम्नॅस्टिक प्रकारात परिना मदनपोत्रा हिने सुवर्ण, तर शुभश्री मोरेने रौप्यपदक पटकावले.

इंदिरा गांधी स्टेडियममध्ये सुरू असलेल्या जिम्नॅस्टिक स्पर्धेत परिनाने हूप, बॉल, क्लब आणि रिबन या चार प्रकारांत मिळून एकूण ८३.६५ गुणांची कमाई केली. शुभश्रीने ८०.२० गुण मिळवले. दिल्लीच्या राचेलदीप हिला कांस्यपदक मिळाले. परिनाने हूप, बॉल, क्लब आणि रिबन या चारही प्रकारांत अव्वल स्थान पटकावले. हूप प्रकारात २२.२० बॉल प्रकारात २०.७५ क्लब प्रकारात २०.६० तर रिबन प्रकारात २०.१० गुण पटकावले. तिचीच संघ सहकारी असलेल्या शुभश्रीने हूप प्रकारात २०.४५, बॉल प्रकारात २०.२०, क्लब प्रकारात २०.५० तर रिबन प्रकारात १९.०५ गुण मिळवले.

कांस्यपदकही महाराष्ट्राच्या किमया ला मिळाले असते पण रिदमिक जिम्नॅस्टिकच्या हूप, बॉल, क्लब आणि रिबन या चार प्रकारात मिळून महाराष्ट्राच्या किमया कार्ले ७८.२५ गुणांची कमाई केली. एकूण कामगिरी बघता तिचे गुण तिसऱ्या क्रमांकाचे होते. मात्र जिमनॅस्टिकमधील नियमानुसार एकाच संघाच्या खेळाडूंना सुवर्ण आणि रौप्यपदक मिळाले असेल तर कांस्यपदक त्याच संघाच्या खेळाडूला दिले जात नाही.

यामुळे कांस्यपदक किमयाऐवजी दिल्लीच्या राचेलदीप हिला देण्यात आले. राचेलने ७५.८५ गुण मिळवले. किमयाच नव्हे तर महाराष्ट्राच्या देवांगी पवार आणि यशस्वी मोरे या दोन खेळाडूंनीदेखील राचेलपेक्षा जास्त गुण मिळवले. देवांगीने ७७.७० तर यशश्रीने ७६.७५ गुण मिळवले. मात्र नियमानुसार राचेल कांस्यपदकाची मानकरी ठरली.

## संत ज्ञानेश्वर महाराज निवासी मूकबधिर विद्यालय कळंबचा दहावीचा १०० टक्के निकाल





**अक्षराज :बसंगिता वनकळस**

**दि.१३,बकळंब (धाराशिव) :** धाराशिव जिल्ह्यात मुकबधिर प्रवर्गातून प्रथम क्रमांक मिळवत,तुळजाई प्रतिष्ठान बहुउद्देशीय संस्था पानगांव संचलित संत ज्ञानेश्वर महाराज निवासी मूकबधिर विद्यालय कळंब जि.धाराशिव येथील इयत्ता दहावी बोर्ड परीक्षेचा १०० टक्के निकाल लागला आहे.

विशेष प्राविण्य ०२, प्रथम श्रेणीत ०६, द्वितीय श्रेणीमध्ये ०१असून निकाल पुढील प्रमाणे आहे.लखन व्यंकट अवधूते - ७५.६०% प्रथम, कु.स्नेहा समाधान कोळी - ७५.२०% द्वितीय, गणेश सुधाकर वनवे - ७१.६०% तृतीय, विष्णू श्रीहरी वायबसे - ६९. ८०% , जयराम व्यंकट अवधूते- ६०.८० %, सुरज प्रताप वाघमारे -६९.६०%, कु.तेजस्विनी प्रदीप चवरे- ६८.०० %, सुमित शिवाजी इंगळे- ६४. ६० %, कृष्णा महादेव शिंदे - ५७. ६०%, या सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे तुळजाई प्रतिष्ठानचे सचिव सन्माननीय श्री.शहाजी चव्हाण साहेब व शाळेचे मुख्याध्यापक श्री. बालाजी जाधवर सर, विशेष शिक्षक आश्रुबा कोठावळे, श्रीमती गुंड सुनीता, श्रीमती सुनंदा गायकवाड, गणेश फरताडे तसेच सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

# लोकमान्य टिळक कन्या विद्यालय चंद्रपूरची उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम





**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१३, चंद्रपूर :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक नागपूर विभागीय मंडळाडरे फेब्रुवारी/ मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या १० वी च्या परीक्षेच्या निकाल आज जाहीर करण्यात आला. यामध्ये लोकमान्य टिळक स्मारक मंडळ चंद्रपूर डरा संचालित लोकमान्य टिळक कन्या विद्यालय चंद्रपूर चा उत्कृष्ट निकाल ९८.५१ टक्के लागला असून विद्यालयातून परीक्षेला २०१ विद्यार्थीनी प्रविष्ट झाल्या होत्या. त्यापैकी १९८ विद्यार्थीनी उत्तीर्ण झाल्या आहेत. प्राविण्य श्रेणीत ५२ विद्यार्थिनी, प्रथम श्रेणीत ८४ विद्यार्थीनी, द्वितीय श्रेणीत ५३ विद्यार्थीनी तर पास श्रेणीत ०९ विद्यार्थीनी उत्तीर्ण झालेल्या आहेत.

विद्यालयातून चैताली भरडकर हीने ९६.६० टक्के गुण प्राप्त करुन प्रथम येण्याचा मान पटकाविला. तर द्वितीय स्थानी वैष्णवी झाडे हीने ९४.८० गुण मिळविले असून तृतीय स्थानी काजोल बोरेवार हीला ९४.२० टक्के गुण मिळाले. चतुर्थ स्थानी हंसिका गेडाम हीला ९३.४० टक्के, कामाक्षी भांदककर ९२.२० टक्के, तन्मयी चिचमलकर ९२.२० टक्के, वैष्णवी दांडेकर ९१.६० टक्के, गुंजन लोनबले ९१.४० टक्के, काव्या चंगाडिया ९० टक्के, दृष्टी फाये ८९.८० टक्के, गौरी भरडकर ८९.४० टक्के, सायली चव्हाण ८९.२० टक्के, स्पृहा देव ८९.२० टक्के तर समिक्षा भडके हीने ८८.८० टक्के गुण प्राप्त केले. सर्व गुणवंत विद्यार्थिनींचे लोकमान्य टिळक स्ममारक मंडळाचे अध्यक्ष अॅड. रवींद्रजी भागवत, संस्थेचे सचिव गांगेय सराफ, तसेच संस्थेचे सर्व सदस्य गण, शाळेच्या मुख्याध्यापिका संध्या बडकेलवार, उपमुख्याध्यापिका अर्चना दुर्गपुरोहीत, पर्यवेक्षिका प्रांजली महादाणी, शाळेतील सर्व शिक्षक वृंदानी पेढा, गुलाबपुष्प आणि भेटवस्तू देऊन पालकांच्या उपस्थितीत कौतुक करुन अभिनंदन केले.

# पारनेर तालुक्यात राजकीय हालचालींना वेग; स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीची लगबग

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१३, पारनेर (अहिल्यानगर) :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका चार महिन्यात घ्या,असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिल्यानंतर पारनेर तालुक्यातील राजकीय पक्षाच्या हालचाली वाढल्या आहेत. या निर्णयानंतर इच्छुक मंडळींची लगीनघाई सुरू झाली असून त्यांच्या पक्षाच्या नेत्यांकडे फेऱ्या वाढू लागल्या आहेत.

पारनेर तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार यांच्या काँग्रेसची ताकद मजबूत आहे, परंतु विधानसभा निवडणुकीत राणीताई लंके यांचा निसटता पराभव झाल्याने या पक्षाची ताकद काहीशी कमकुवत झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे महायुतीचे आमदार काशिनाथ दाते थोड्या फरकाने विजयी झाले. मात्र,असे असताना सहा महिन्यांमध्ये पक्षांतर्गत मतभेद झाले आहेत. तालुक्यात राष्ट्रवादी अजित पवार गटात सर्वकाही आलबेल नसल्याचे दिसून येत आहे. आता गटबाजीमुळे त्याचा फटका राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) गटाला बसण्याची शक्यता आहे.

शिवसेना (उबाठा) व शिंदे या पक्षाची फारशी ताकद नाही. भाजपचे माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्यामुळे या पक्षाला तालुक्यात तरतरी आहे. परंतु भाजप पक्षाची ताकद तालुक्यात म्हणावी अशी नाही. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत या पक्षाला फारच मेहनत घ्यावी लागेल.

तालुक्यात काँग्रेसची ताकद फारशी नाही. त्यामुळे काँग्रेस पक्ष सध्या पारनेर तालुक्यात नावापुरता राहिला असल्याचे दिसून येते आहे. शरद पवार यांच्या राष्ट्रवादीला मानणारे कार्यकर्ते पारनेर तालुक्यात अधिक आहेत. परंतु याचे रुपांतर मतात होणे अपेक्षित आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे खासदार नीलेश लंके व पक्षाचे तसेच निलेश लंके प्रतिष्ठानचे कार्यकर्ते जर सक्रीय झाले तर निवडणुकीत रंगत आणू शकतात. शिवसेना तालुकाप्रमुख डॉ. श्रीकांत पठारे व इतर पदाधिकारी यांच्यामुळे शिवसेना (उबाठा) ची ताकद तालुक्यात मजबूत आहे. परंतु पक्ष फाटाफूटीनंतर या पक्षाचे कार्यकर्ते ही फारसे सक्रीय दिसत नाही. दरम्यान स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका युती किंवा आघाडी करून लढवीणार की, सगळे पक्ष वेगवेगळे लढणार? पक्षाच्या नेत्यांचा आदेश काय येतोय हे देखील महत्वाचे असणार आहे.

पारनेर पंचायत समिती व जिल्हा परिषद निवडणुका पुढ्यात आहेत. या स्थानिक संस्थांवर प्रशासक असल्याने सामान्य जनतेची कामे मोठ्या प्रमाणात रेंगाळलेली आहेत. संबंधित संस्थेचे प्रमुखच त्या संस्थेवर प्रशासक म्हणून नियुक्त केल्याने सामान्य लोकांची कामे तातडीने मार्गी लागत नाहित.

या संस्थांवर सदस्य नसल्याने सामान्य नागरिकांनी तक्रार कोणाकडे करायची? असा प्रश्न या जनतेला आहे. दोन वर्षाहून अधिक काळ या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुढे ढकलल्या जात होत्या. आता सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर सगळेच राजकीय पक्ष उमेदवारांची चाचपणी करू लागले आहेत.

आता राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष एकसंघ न राहिल्याने या दोन्ही पक्षांना खूप कसरत करावी लागणार आहे. दरम्यान, यापुर्वी पारनेर पंचायत समितीची सत्ता राष्ट्रवादी काँग्रेसच्या एकहाती होती. या निवडणुकीत कोणता पक्ष कोणासोबत युती व आघाडी करील यावर पुढील गणित अवलंबून असणार आहे.

# बुद्ध जयंतीनिमित्त धाराशिव शहरात भव्य धम्मरॅली युद्ध नको, बुद्ध हवा च्या घोषणांनी शहर दुमदुमले

**अक्षराज : विकास वाघ**

**दि.१३, धाराशिव :** विश्वाला शांतीचा संदेश देणारे तथागत गौतम बुद्ध यांची २५६९ वी जयंती धाराशिव शहरात ठिकठिकाणी विविध उपक्रमांनी सोमवार, १२ मे रोजी साजरी करण्यात आली. सायंकाळी शहरातून काढण्यात आलेल्या रॅलीत युद्ध नको, बुद्ध हवा यांसह विविध घोषणांनी परिसर शहर दुमदुमले होते. या रॅलीत शहर व परिसरातील उपासक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.



महाकारुणिक तथागत गौतम बुद्ध यांच्या जयंतीनिमित्त सोमवार १२ मे रोजी सकाळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथे तथागत गौतम बुद्ध व महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना धुप, दीप व पुष्प अर्पण करून त्रिशरण पंचशील व गाथा पठण करण्यात आले.

भारतीय बौद्ध महासभा, स्मृती बुद्ध विहार धाराशिव,समता सैनिक दल यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य धम्म रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.भीम नगर येथील क्रांती चौक येथून सायंकाळी सात वाजता भव्य धम्म रॅलीस प्रारंभ झाला. क्रांती चौक येथून ही रॅली सिव्हिल हॉस्पिटल, मारवाडी गल्ली, गवळी गल्ली, नेहरू चौक, काळा मारुती चौक, पोस्ट ऑफिस,लेडीज क्लब,संत गाडगेबाबा चौक मार्गे डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथे सांगता झाली. यावेळी उपासक उपासिका यांनी त्रिशरण,पंचशील सामुदायिक वंदना घेण्यात आली. या रॅलीमध्ये युद्ध नको बुद्ध हवा, बौद्ध धम्माचा विजय असो, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा विजय असो, उठा बंधुनो जागे व्हा बौद्ध धम्माचा स्वीकार करा, बुद्ध सुताची ची एकच वाणी बुद्धम् शरणम् गच्छामि, सम्राट अशोक राजाचा विजय असो आदी घोषणांनी संपूर्ण धाराशिव शहर दुमदुमून गेले होते. या रॅलीमध्ये धाराशिव शहर व परिसरातील उपासक उपासिका शुभ्र वस्त्र परिधान करून हाती पंचशील ध्वज घेऊन सहभागी झाले होते. भिख्खू संघाचे भंते अनिरुद्ध, भंते सुमेध, भंते अश्वजित, भंते सोपाक, भंते नंद, भंते दीपंकर,भंते राहुल, ठाणे जिल्हा अध्यक्ष तथा केंद्रीय अध्यक्ष ए.जी तायडे जिल्हा अधक्ष राजश्री कदम,तालुका अधक्ष्य विजयमाला धावारे, गुणवंत सोनवणे, धनंजय वाघमारे, शिलाताई चंदनशिवे,सचिन ,बाबासाहेब बनसोडे, स्वराज जानराव,सचिन दिलपाक,बापू जावळे, प्रवीण बनसोडे, संदीप बनसोडे, उपस्थित होते. या रॅलीच्या यशस्वीतेसाठी भारतीय बौद्ध महासभा, स्मृति बुद्ध विहार आणि समता सैनिक दल धाराशिव शाखा चे पदाधिकारी आणि सदस्य तसेच उपासक आणि उपासीका यांनी परिश्रम घेतले.

> महाकारूणीक तथागत गौतम बुद्ध यांची ध्यानस्थ बसलेली मूर्ती फुलांनी सजविण्यात आलेल्या रथामध्ये ठेवण्यात आली होती. या रथाला आकर्षक अशी विद्युत रोषणाई करण्यात आली होती. ही मूर्ती सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते.

# भानेगाव येथे तथागत गौतम बुद्ध जयंती विविध कार्यक्रमांतर्गत साजरी

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१३, नागपूर :** नागपूर जिल्ह्याच्या सावनेर तालुक्यातील भानेगाव येथील नवीन बिना बौद्ध विहारात भारतीय बौद्ध महासभा, आम्रपाली व संघमित्रा महिला मंडळ आणि राहुल नवयुवक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने महाकारुणीक तथागत गौतम बुद्ध जयंती विविध कार्यक्रमांतर्गत उत्साहात साजरी करण्यात आली.




सकाळी कंत्राटदार नंदकिशोर मेश्राम व सुरेखा दत्तगुरू तागडे यांच्याहस्ते पंचशील ध्वजारोहण करण्यात आले. दुपारी आम्रपाली महिला मंडळाडरे परित्राण पाठ घेण्यात आले. सायंकाळी सामुहिक बुद्ध वंदना घेतल्यानंतर भारतीय बौद्ध महासभेच्या सल्लागार समितीच्या नेतृत्वात नवीन बिना वार्ड क्रमांक १ व २ परिसरातून कँडल मार्च काढण्यात आला. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी नागपूर जिल्हा ग्रामीण राष्ट्रवादी काँग्रेसचे(शरदचंद्र पवार) उपाध्यक्ष अमर जैन यांनी नवीन बिना बौद्ध विहारातूनच सर्वप्रथम भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व तथागत गौतम बुद्ध जयंती साजरी करण्याची प्रथा खापरखेडा परिसरात झाली असून वर्तमान व भविष्यातील अभिनव कार्यक्रमासाठी भारतीय बौद्ध महासभा शाखा नवीन बिना यांचे कौतुक व अभिनंदन केले. विशेष अतिथी म्हणून सावनेर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती रवींद्र चिखले यांनी तथागत गौतम बुद्धांच्या सम्यक मार्गाची प्रासंगिकता विषद केली. विशेष अतिथी म्हणून नागपूर जिल्हा परिषदचे माजी सदस्य प्रकाश खापरे माजी सदस्य यांनी जगाला युद्धाची गरज नसून बुद्धाची गरज आहे असे मत मांडतांना नवीन बिना बौद्ध विहाराच्या विकासासाठी संपूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. ग्रामपंचायत भानेगांवच्या सरपंच शालिनी चवरे यांनी स्पर्धेत विजयी ठरलेल्या विजेत्यांचे अभिनंदन करतांना लक्ष्य गाठण्यासाठी सराव व सातत्य ठेवण्याचा सल्ला दिला. कार्यक्रम व भारतीय बौद्ध महासभेचे अध्यक्ष डॉ. जितेंद्र सावजी तागडे यांनी नवीन बिना बौद्ध विहाराच्या विकासासाठी कटिबद्ध असून बुद्धाच्या मध्यम मार्ग मानवाच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वोत्तम आहे असे मत मांडले. याप्रसंगी चिचोली (खापरखेडा) ग्रामपंचायतच्या सरपंच तागडे, सदस्य निकिता वासनिक, वंदना वामन कुंभारे, सामाजिक कार्यकर्त्या, भानेगाव माजी सरपंच कविता बोरकर, बजरंग दलाचे अमोल कळंबे, सुरेश कराडमारे, विजय निकोसे, उत्तम खोब्रागडे, नंदकिशोर मेश्राम, कुसुम गौरकर, अर्चना विजय गौरकर, ग्रामपंचायत सदस्य भूषण गौरकर, सोनाली बागडे, भारतीय बौद्ध महासभा नवीन बिना उपाध्यक्ष अनिल लांजेवार, सचिव मुकेश बागडे, कोषाध्यक्ष रवींद्र ढोके, हिशोब तपासनीस नरेश डोंगरे धम्मपीठावर उपस्थित होते.

यावेळी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती महोत्सवानिमित्त घेण्यात आलेल्या विविध स्पर्धेच्या विजेत्यांना बक्षीस देवून प्रोत्साहित केले गेले व १० व्या १२ व्या वर्गात उत्तीर्ण रीदिमा नारायण वारकर, भाग्यश्री मदन श्रीरामे, संकेत दिगांबर वहाणे, यश विनोद कोसे, अंशूल सुरेश वासनिक तर नवोदय विद्यालयात प्रवेश परीक्षा उत्तीर्ण करून प्रवेश मिळविल्याबद्दूल जीविशा जितेश देशभ्रतार या गुणवंत विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाची सांगता विजय गौरकर, आंचल इंजिनीयरिंग व गावकऱ्यांच्या सौजन्याने आयोजित सामुहिक भोजनदानाने करण्यात आली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी भारतीय बौद्ध महासभा, आम्रपाली व संघमित्रा महिला मंडळ आणि राहुल नवयुवक संघाच्या कार्यकारिणीने परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मालवी नारनवरे, सुत्रसंचालन सारिका तागडे तर आभार विशाखा ढोके यांनी मानले.

# थोडक्यात

## नवी मुंबईत बालनाट्य शिबिराचे आयोजन संपन्न



**अक्षराज : आदिनाथ देशमुख**

**दि.१३, नवी मुंबई :** संत शिरोमणी कला मंच नवी मुंबई आणि नवी मुंबई बालरंग भूमी यांच्या संयुक्त विद्यमाने बालनाट्य शिबिराचे आयोजन २ मे ते ११ मे २०२५ या कालावधीमध्ये करण्यात आले होते. या बालनाट्य शिबिराचा समारोप सोमवार दि. १२ /५/ २०२५ रोजी सकाळी अकरा वाजता विष्णुदास भावे नाट्यगृह वाशी येथे संपन्न झाला . या प्रसंगी सुलेखनकार पद्मश्री . अच्युत पालव सर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्याचबरोबर नाटक सिनेमा लेखक. मुकुंद महाले. गायक आणि निर्माते सुनील वाडकर पालक प्रतिनिधी सुशीला शार्दुल विशेष सहकार्य करणाऱ्या अर्चना खरात मॅडम उपस्थित होते. दरम्यान गेली अठ्ठावीस वर्षे ज्येष्ठ रंगकर्मी व शिबिर मार्गदर्शक श्रीहरी पवळे हे दिवाळी आणि उन्हाळी सुट्टीतील बालनाट्य शिबिराचे आयोजन करीत असतात. सदर बालनाट्य शिबिराचे उद्घाटन २ मे रोजी लेखक दिग्दर्शक सुप्रसिद्ध अभिनेते संतोष पवार यांच्या हस्ते संपन्न झाले होते. बालनाट्य शिबिर समारोप प्रसंगी उपस्थित मान्यवरांच्या शुभहस्ते प्रमाणपत्र देऊन शिबिरार्थींना गौरविण्यात आले या शिबिरातून शिकून गेलेला व यशस्वी वाटचाल करत असलेल्या माजी विद्यार्थ्याला संस्थेतर्फे एकलव्य पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते तो सन्मान यावर्षी माजी विद्यार्थी राहुल अहिरे यांना सुलेखनकार पद्मश्री अच्युत पालव यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना समाजात चांगली मूल्य रुजली पाहिजे म्हणून विद्यार्थ्यांबरोबर पालकांचे शिबिर घ्या ज्या पालकांच्या या कलाक्षेत्रातील आपलं स्वप्न अपूर्ण असेल त्यानिमित्ताने ते पूर्ण होईल असे प्रतिपादन कार्यक्रमाचे अध्यक्ष. सुलेखनकार पद्मश्री अच्युत पालव सर यांनी संबोधित केले. सातत्याने गेली अठ्ठावीस वर्षे बालनाट्य कार्यशाळा श्रीहरी पवळे यशस्वी करीत आहे या बालनाट्य कार्यशाळेत स्वयंशिस्त,नाटकाच्या विविध अंगाचा अभ्यास, सर्वांगीण विकास शिस्तीचे धडे श्रीहरी पवळे यांनी दिले. यावेळी प्रशिक्षणार्थींनी बालनाटिका सादर केल्या फुलांच्या राज्यात, सावध व्हा होईल चमत्कार, उत्सव गणपती वाडीचा बालनाटिका सादर करून पालकांची, प्रेक्षकांची मने जिंकली पालकांनीही भरपूर कौतुक केले.या शिबिरात माजी विद्यार्थी सौरभ धुमाळ, ओंकार वंडेकर, सोहम,तन्वी शिंदे विद्यार्थी हजर राहून सहभागी झाले या कार्यक्रमाचे स्वागत गीत स्वरा साळवे व कार्यक्रमाची सुरुवात आर्या तांदळे हिने गणेश वंदन तर नटरंग नृत्य प्रिशा खरात यांनी नृत्य सादर केले. प्रमाणपत्र वाचन रंजना सावंत यांनी तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आभार श्रीहरी पवळे यांनी केले. कार्यक्रम संपल्यानंतर प्रशिक्षणार्थी एकमेकांना पुन्हा दिवाळीत भेटण्यासाठी शुभेच्छा देऊन मार्गस्थ झाले.

## बाभुळवाडे गावाप्रमाणे रोड मॉडेल व्हिलेज संकल्पना राज्यभर राबवणार - शरद पवळे



**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.१३, सुपा (अहिल्यानगर) :** शेत तिथे रस्ता व गाव तिथे समृद्धी या अभियानाच्या माध्यमातून महाराष्ट्र राज्य शिव पाणंद चळवळीच्या माध्यमातून शेतरस्त्यांच्या प्रश्नावर राज्यभर आंदोलने जनजागृती करत न्यायालयीन लढा यशस्वी करत राज्यसरकारचे लक्ष वेधत राज्यसरकारला शेतरस्त्यांच्या प्रश्नावर प्रत्यक्ष अंमलबजावनी करालयला चळवळीच्या माध्यमातून यश आले असुन जेष्ठ समाजसेवक आण्णासाहेब हजारे, पोपटराव पवार यांच्या कार्यबद्धतीप्रमाणे पारनेर तालुक्यात उभ्या झालेल्या महाराष्ट्र राज्य शिव पाणंद शेतरस्ता चळवळीची राज्यात ओळख निर्माण झाली असुन राज्यभर विविध गावागावात तालुक्यात जिल्ह्यात ब्रिटीश कालीन शिव पानंद शेत शिवार रस्ते आज मोठ्या प्रमाणावर खुले होत असुन याची व्यापकता वाढवण्यासाठी बाभुळवाडे गावच्या ग्रामसभेच्या ऐतिहासिक निर्णयानंतर रोड मॉडेल व्हिलेजाचा शुभारंभ छत्रपती शिवरायांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करत गावात ग्रामसभा घेण्यात आली. यावेळी उपसरपंच बाळासाहेब नवले यांनी प्रस्ताविक केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष जेष्ठ पत्रकार विनोदजी गोळे, शिव पाणंद शेतरस्ता चळवळीचे प्रणेते शरद पवळे,ॲड.अजिंक्य गवळी, मंडल अधिकारी करोसिया मॅडम, चेअरमन गणपत जगदाळे, चळवळीचे सचिन शेळके, प्रमोद खणकर आदिंनी ग्रामस्थांना मार्गदर्शन केले.

गावातील शेतरस्त्यांचा आराखडा बनवुन त्यांची नकाशाप्रमाणे मोजणी करून रस्ते खुले करून गावातील रस्ता केसेसची प्रकरणे कौटुंबिक भेट घेवुन त्या त्या स्थरावर जेष्ठ अनुभवी नागरीकांच्या माध्यमातून गावातच प्रश्न सोडवायचे आदी विविध विषयांवर सकारात्मक वातावरणात ऐतिहासिक चळवळीचा बाभुळवाडे गावात कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी सरपंच वैशाली देवेंद्र जगदाळे, सामाजिक कार्यकर्ते गुलाबराव नवले, ग्रामसेवक शेळके मॅडम, तलाठी प्रदिप पवार, नितिन खणकर, बाळासहेब गुंजाळ, सुरेश वाळके, संजय साबळे, दशरथ वाळुंज, भाऊसाहेब वाळूंज,-बबन गुंड, बबन मावळे, दिलीप बोऱ्हुडे, भिवाजी जगदाळे, भिकाजी जगदाळे,सचिन जगदाळे, भाऊसाहेब जगदाळे, सविता जगदाळे, निषिगंधा बोऱ्हुडे आदि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.